# लक्ष्मणरावांची उद्यमनगरी

कर्नाटकातील धारवाडजवळच्या गुर्लहोसूर गावाने देशाला दोन सुपुत्र दिले. आधुनिक मराठी रंगभूमीचे आद्य नाटककार कै. बळवंत पांडुरंग तथा अण्णासाहेब किर्लोस्कर (जन्म ३१ मार्च १८४३, मृत्यू २ नोव्हेंबर १८८५) आणि 'महाराष्ट्राचे हेन्री फोर्ड' म्हणून संबोधले जाणारे लक्ष्मणराव काशिनाथ किर्लोस्कर (२० जून १८६९-२६ सप्टेंबर १९५६). १८८० मध्ये अण्णासाहेबांनी 'शाकुंतल' व पाठोपाठ 'सौभद्र' लिहून सांस्कृतिक भावजीवनात एक अध्याय लिहिला, तर १८८८ मध्ये 'किर्लोस्कर ब्रदर्स' नी महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रात मानाचे पान लिहिले.

२६ मार्च १९१० रोजी वयाची चाळिशी पार केलेले लक्ष्मणराव अपुरी साधने, पण प्रचंड मोठी स्वप्नं घेऊन रेल्वेच्या कुडल रोड स्टेशनवर सहकाऱ्यांसह उतरले. तिथे निवडुंगाच्या काटेरी वनात किर्लोस्करवाडीची उद्यमनगरी उभी राहिली. मात्र, मातृछत्र लहानपणीच हरपलेल्या लक्ष्मणरावांची त्या आधीची वाटचाल विलक्षण संघर्षमय आहे.

वयाच्या पंधराव्या वर्षी लक्ष्मणरावांनी चित्रकला व यंत्रविद्या यात शिक्षण घ्यायचे असल्याचे वडिलांना सांगितले. प्रवासापुरते पैसे घेऊन लक्ष्मणरावांनी मुंबई गाठली. नव्याने सुरू झालेल्या जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्समध्ये त्यांनी प्रवेश घेतला व तिन्ही ग्रेड्सच्या परीक्षा दिल्या. पण, डोळ्यांना रंगाची परीक्षा करता येत नसल्याने ते त्यांच्या आवडत्या यंत्रकलेकडे वळले. नुकत्याच सुरू झालेल्या व्ही. जे. टी. आय. या टेक्निकल स्कूलचे ड्रॉइंग टीचर झाले. पण जवळच्या वर्कशॉपमध्ये लेथ, ड्रिलिंग मशिन, शेपिंग मशिन्स या यंत्रात



रमू लागले 'अमेरिकन मशिनिस्ट,' 'सायंटिफिक अमेरिकन' यांसारखे यंत्रविषयक साहित्य वाचणे, त्याची टिपणे करून स्वत: प्रयोग करणे, हे सुरू होते. एका जुन्या छापखान्यात सुधारित छपाई यंत्र मागवून ते बसवून देण्याचे कामही त्यांनी पुरे केले. तसेच, ग्रँड ईस्टर्न मिलसाठी लागणाऱ्या यंत्राची ड्रॉइंग व अन्य कामे करून देण्यात पुढाकार घेतला.

१८८७ च्या सुमारास काही पारशी मंडळी सायकल चालवताना दिसली. त्यांनी इंग्लंड, अमेरिकेतून या नव्या वाहनाबद्दल माहिती मागवली. सुटे भाग, जुळणी, दुरुस्तीत प्रावीण्य मिळवून दोन सायकली बेळगावला मोठ्या बंधूकडे पाठवल्या. 'किर्लोस्कर ब्रदर्स' या नावाने १८८८ मध्ये सायकलचे विक्रेते म्हणून सुरू झालेल्या 'किर्लोस्कर ब्रदर्स लि.' चा उद्योग आज जगभर फैलावला आहे.

१८९७ मध्ये पत्नी राधाबाईसह ते बेळगावला आले. १९०१ मध्ये वैरण कापणीचे यंत्र स्वत: कल्पकतेने तयार केले.

अमेरिकन 'फौंड्री' या मासिकाच्या आधारे प्रयोग करून त्यांनी लोखंडी नांगर तयार केले. लाकडी नांगराच्या जागी आलेल्या या नव्या नांगराने एका मोठ्या औद्योगिक घटनेची नोंद झाली. लक्ष्मणरावांचे मुंबईचे सहाध्यायी, औंध संस्थानचे युवराज बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी कुंडल रोडजवळ देऊ केलेल्या जागेत लक्ष्मणरावांनी किर्लोस्करवाडी वसवली. जातिभेद, दुष्ट चालीरीती उखडून त्यांनी आधुनिक विचारांचे नगर वसवले. शिक्षा भोगणाऱ्या पिऱ्या, तुक्या या गुन्हेगारांना वाडीचे संरक्षक नेमले.

थायलंडमध्ये भयंकर पावसाने थैमान घातल्याने आलेल्या पुरामुळे जंगलात, आपल्या प्रशिक्षकाबरोबर ट्रेकींगला गेलेली फुटबॉल टीमची बारा (१२) तरूण मुले, एका पाच कि.मी. हून मोठ्या असलेल्या गुहेत पुराच्या पाण्यात अडकली होती. सतरा दिवस अडकून पडलेल्या या तरूण मुलांना त्यांच्या प्रशिक्षकासह पाण्यातून सुखरूप बाहेर काढण्यासाठी किर्लोस्कर ब्रदर्सच्या फ्लड पंप्स्ची खूप मदत झाली. जगभर चर्चेचा विषय झालेल्या ह्या घटनेत सर्वजण दि. १० जुलै २०१८ पर्यंत सुखरूप बाहेर आले. किर्लोस्कर ब्रदर्सचे अधिकारी श्री. प्रसाद कुलकर्णी आणि त्यांची सर्व टीम यांनी या बाबतीत दिलेल्या त्यांच्या योगदानामुळे, ते सर्वजण अभिनंदनास पात्र आहेत. इतर देशांचीही या 'सुटका-नाट्यात' भरीव मदत झाली आहे. त्यामुळे त्यांच्या बरोबरच भारताची मान उंचावली आहे.

यंत्र कितीही कुशल असले, तरी माणूस व त्याची बुद्धी, कौशल्य महत्त्वाचे आहे, असे मानणाऱ्या लक्ष्मणराव आणि त्यांच्या किर्लोस्कर परंपरेला अभिवादन.

**संपादक**

